ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याकरिता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे अधिकार या समितीला प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०१९/प्र.क्र.१०/योजना-१०
बांधकाम भवन, तळ मजला,
२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
तारीख: ०९ सप्टेंबर, २०१९.

**वाचा :-**

1. **शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१८/प्र.क्र.३४८/योजना-१०, दि. १६.०२.२०१८.**
2. **शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१८/प्र.क्र.२५६/योजना-१०, दि. २०.०८.२०१८.**

**प्रस्तावना :-**

केंद्र व राज्य शासनाने सन २०२२ पर्यंत ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना घरे उपलब्ध करुन देण्याची महत्वाकांक्षी मोहिम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुले बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

२. या योजनांमधील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित आहेत. ही बाब विचारात घेऊन, राज्य शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुल पात्र परंतु, घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदीसाठी रुपये ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते.

३. सर्वसाधारणपणे गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी, वनक्षेत्र व ज्या जमिनीवर वास्तव्य करणे योग्य नाही अशा जमिनी वगळून इतर सर्व शासकीय जमिनीवरील दि. ०१.०१.२०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण करून राहणाऱ्या सर्व अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास राज्य शासनाने वरील संदर्भ क्र. १ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

४. या धोरणानुसार निवासी प्रयोजनार्थ झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी विविध विभागाकडील जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी संबंधित विभागाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागांशी समन्वय करणे अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये एकसूत्रता नसणे यामुळे अशाप्रकारची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

५. ही बाबी विचारात घेऊन याप्रकरणी सर्व विभांगाशी समन्वय करणे व या विभागांच्या जमिनीवरील अतिक्रमणे जलद गतीने नियमानुकूल करणे सोईचे व्हावे या दृष्टीने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

सर्वसाधारणपणे गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी, वनक्षेत्र व ज्या जमिनीवर वास्तव्य करणे योग्य नाही अशा जमिनी वगळून इतर सर्व शासकीय जमिनीवरील दि. ०१.०१.२०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण करून राहणाऱ्या सर्व अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करणे सोईचे व्हावे या दृष्टीने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. तसेच, या समितीस असे अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) जिल्हाधिकारी | ... | अध्यक्ष |
| ब) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | ... | उपाध्यक्ष |
| क) सहाय्यक संचालक नगररचना | ... | सदस्य |
| ड) जिल्हा अधिक्षक भुमीअभिलेख | ... | सदस्य |
| इ) कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. | ... | सदस्य |
| ई) ज्या विभागाची जमिन आहे त्या विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी. | ... | सदस्य |
| उ) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) | ... | सदस्य सचिव |

**२. समितीची कार्यपध्दती:-**

२.१ प्रस्तुत समितीची प्रत्येक महिन्यातून कमीत कमी एकदा बैठक घेण्यात यावी.

२.२ अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव एकत्रित करून विभागनिहाय प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात यावेत.

२.३ समिती विभागनिहाय प्राप्त प्रस्तांवांवर चर्चा करून विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन, व शासनाच्या धोरणानुसार व त्यामागच्या तर्क व भूमिका विचारात घेऊन अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही १५ दिवसात करण्यात यावी.

२.४ अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या प्रस्तावांची यादी गटविकास अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३. प्रस्तुत शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०९१२१४३८१८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Sudhakar Pathak

Digitally signed by Hemant Sudhakar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, cn=Hemant Sudhakar Pathak
Date: 2019.09.09 17:32:51 +05'30'

**(हे.सु.पाठक)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

1) मा. राज्यपाल यांचे सचिव.
2) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव.
3) सर्व मा.मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. विरोधी पक्षतेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५) सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

६) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) विभागीय आयुक्त (सर्व)

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

९) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई.

१०) उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).

११) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा , जिल्हा परिषद, सर्व.

१२) निवड नस्ती (योजना-१०).